Golden Research Thoughts ISSN 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-10 | April-2015 Available online at www.aygrt.isrj.org

सत्यशोधकीय ग्रामीण कविता (प्रारंभ ते १९३०)

तानाजी अंबादास देशमुख
सह्यायक प्राध्यापक, मराठी विभाग प्रमूख, वसुंधरा कला महाविद्यालय, जूळे सोलापूर, सोलापूर

Authors Short Profile

TANAJI Ambadas Deshmukh is working as an assistant Professor at Department of Marathi leaders in Earth Art College, jule Solapur Solapur.



सारांश :

भारतात एकोणिसावे शतक व विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात प्रबोध-ापर चळवळींचा उदय झाला. या चळवळीनी मानवी मनातील पारंपरिक धर्मव्यवस्था, अनिष्ट रूढी-परंपरा, समाजव्यवस्था यास विरोध दर्शवून आधुनिक मूल्यांवर नवसमाज निर्मितीचा विचार मांडला. यातून लोकजागृती व लोकशिक्षणाचे प्रयत्न झाले. या प्रबोधनपर चळवळीचा आशय समाजमनावर खोलवर बिंबविण्यासाठी चळवळीतील कवींनी ग्रामीण कृषीजनसमूहाला केंद्रस्थानी ठेवू-ा □ाव्यनिर्मिती केली. मु□यत: या कवींची रचना ही देशी रनाबंधाशी संबंधित आहे. हे देशी रचनाबंध शेकडो वर्षापासून लोकजीवनाशी , लोकसंस्कृतीशी, लोकगीतांशी निगडित आहेत. ते लोकाभिरूचीने घडविलेले व वाढविलेले आहेत. सुबोधता, लयबध्दता, गेयता, लोकसंगीतानुकुलता, परिणामकारकता इत्यादी गुणांमुळे ते थेट लोकमनाशी भिडणारी अत्यंत महत्त्वपूर्ण कविता आहे. प्रारंभिक ग्रामीण कविता ही प्रामुख्याने सामाजिक आशयपर आहे. या लेखात आधुनिक कवितेचे जनक महात्मा जोतीराव फुले यांच्या पासून १९३० पर्यंतच्या सत्यशोधक चळवळीतील ग्रामीण कवितांचा धावता आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तावना

सत्यशोधक चळवळीतील अनेक कविंच्या ग्रामीण कविता प्रसिध्द आहेत. त्यात म. फुले, सावित्रीबाई फुले, कृष्णराव भालेकर, पं.धोडीराम कुंभार, मोतीराम वानखडे, नारायण विभूते, शामराव कुलट, रामचंद्र जाधव, केशवराव जेधे, हरिभाऊ चव्हाण, काशीराव देशमुख आणि मुकुंदराव पाटील यांची 'कुळकर्णीलीलामृत' व 'शेटजी प्रताप' ही खंडकाव्ये प्रसिध्द झाली आहेत.

म. फुले हे क्रातिकारक विचाराचे कृतिशील समाजसुधारक होते. ते सर्जनशील लेखक ही होते. कवी होते. त्यांच्या कविता आशयाने प्रगल्भ असून काव्यप्रकाराने समृध्द आहेत. या कवितेनेच पुढे ग्रामीण कवितेला नवी दिशा दिली आहे. देशीयतेने विकासाच्या शक्यता सूचित केल्या आहेत. ही कविता पारंपरिक मराठी किवितेपेक्षा आशयाच्या दृष्टीने भिन्न असून लोक प्रबोधनाला अनुकूल असे रचनाबंध स्वीकारलेली प्रयोजनवती कविता आहे. म. फुल्यांच्या कवितेमध्ये काव्यरचना १९४ , स्फुट पद्यरचना २७ आणि 'ब्राह्मणाचे कसब' हे खंडकाव्य यांचा समावेश आहे. डॉ. रवींद्र ठाकूर यांनी या कवितेची आठ भागात विभागणी केली आहे. या मध्ये पोवाडे , 'ब्राह्मणाचे कसब' , 'अभंगरचना' , 'अखंड' आरत्या, लोकगीत धाटणीचे भटाची वाणी व ब्राह्मणाचा भौदूपणा हे पद , पत्ररुप अखंडरचना व उद्देशिका ,मंगलाष्टका आणि प्रासंगिक रचनांचा समावेश आहे.[१] 'पवाडा: छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा' (१८६९) या पोवाडयात शिवाजी महाराजास कुळवाडी भूषण असे संबोधले आहे.शुद्रातिशुद्र समाजाला लुटणा-या ब्राह्म□ी कसबाच्या लीला 'ब्राह्मणाचे □सब' (१८६९) या खंडकाव्यात वर्णलेल्या आहेत. 'गुलामगिरी' या ग्रंथात 'मारवाडी व भट यांचे कसबविषयी' या पहिल्या अभंगात शुद्रातिशुद्राच्या जीवनशैलीचे हुबेहूब आणि हृदयस्पर्शी चित्रण आले आहे. 'भटांच्या मतलबी ग्रंथाचे कसब याविषयी' या दुस-या चरणाच्या अभंगात आळशी भट आणि कष्टाळू शेतकरी यांच्या जीवनशैलीची तुलना केली आहे आणि 'भटांचे कसब आणि शूद्राचा देवभोळेपणा याविषयी' या अभंगातून देव आणि भक्त यामधील मध्यस्थ्यांच्या उच्चाटनाचा विचार व्यक्त केला आहे. म. फुले यांनी अभंग याऐवजी 'अखंड' ही संज्ञा आपल्या काव्याला योजिली आहे. त्यांचे १९४ अखंड उपलब्ध आहेत. यामध्ये विषयाची विविधता असून माणूसकेंद्रीत समता स्थापण्याचा ध्यास आहे.त्यांची 'कुळबीण' ही अखंडरचना वेगळया स्वरूपाची असून विलासी जीवन जगणारी ब्राह्मण स्त्री व उन्हापावसात, शेतात काबाडकष्ट करणारी शेतकरीण (कुळबीण) या दोघींमध्ये तुलना या अखंडामधून वर्णन केली आहे. तत्कालीन शेतकरी कुटुंबातील स्त्रीचे हे प्रातिनिधिक चित्र आहे.

भारतीय प्रबोधन युगातील पहिल्या भारतीय शिक्षिका, स्त्रीमुक्तीच्या उद्‌गात्या, महिला शिक्षणाच्या पहिल्या सक्रिय पुरस्कर्त्या म्हणून आपण क्रातिज्योती सावित्रीबाई यांच्याकडे पाहतो. सावित्रीबाई फुले यांचे '□ाव्यफुले' आणि बावन्नकशी सुबोध रत्नाकर (१८९२) या दोन काव्यपुस्तिका प्रसिध्द आहेत. काव्यफुले या काव्यसंग्रहात एकूण ४१ कविता आहेत. यापैकी आठ-दहा कविता या समकालीन विषयाची मांडणी करणा-या आहेत. बावन्नकशी सुबोध रत्नाकर यामध्ये एकूण भुजंगप्रयात वृत्तातील बावन्न कडव्यांचा समावेश आहे. दीर्घरचनेची उपोद्‌घात, सिध्दता, पेशवाई, आंग्लाई, जोतिबा, उपसंहार या सहा ठळक भागामध्ये विभागणी केली आहे. यामधील आंग्लाई या चौथ्या विभागात सावित्रीबाईंनी शुद्रातिशुद्र, शेतकरी, कष्टकरी हे अज्ञा-ी

आहेत. यामुळे त्यांना सुख मिळत नाही. यासाठी शेतक-यांनी शेती सुधारण्यावर भर द्यावा असा त्यांच्या उत्थानाचा उपाय सूचविला आहे.

'म्हणे बांध शेती पहा या विहीरी,
पहा पी□ माझे कशी छान ज्वारी',[२]

सावित्रीबाईची कविता फक्त समस्या प्रकट करीत नाही तर उपायाचे संसूचन करणारी जातीवंत तळमळीतून अविष्कृत झालेली ही कविता आहे. ब्रिटिश काळातील श्रेयशून्य बहुजन समाजाचे व त्यांच्या पशूवत जीवनशैलीचे दर्शन या कवितेमध्ये आहे.

□ृष्णराव भालेकर हे दीनबंधूचे पहिले संपादक व सत्यशोध□ चळवळीचे क्रियाशील कार्यकर्ते होते. शेतक-यांची दुरावस्था व त्याची कारणे त्यांनी प्रत्यक्ष पाहिली व अनुभवली होती. त्यांचे दु:ख, दैन्य, दारिद्रय दूर करण्यासाठी ते संघटनात्मक व वैयक्तिक पातळीवर जसे कार्यरत होते, तसेच त्यांचे वास्तव व भेदक चित्रण कवितेतून करीत होते. पुस्तकरूपाने प्रसिध्द होण्याअगोदर त्यांच्या रचना 'दीनमित्र' मासिकामध्ये प्रसिध्द झाल्या आहेत. कृष्णराव भालेकर यांनी 'आमचे कारागीर, पूर्वीची व सांप्रतची स्थिती, कलगीतुरा, शिवशक्ती, द्वैताद्वैत वगैरे विषयांवर वादविवाद करणारास विनंती, ' या पोवाडयातून तत्कालीन देशी संस्थानिकांची कारागीर शेतक-यांविषयी अनास्था व नव्या आव्हानाचे अज्ञान दाखविले आहे. 'राघू गाडीवानाचा पोवाडा', या पोवाडयातून शेतकरी , कष्टक-यांच्या दु:ख, दैन्याचा आक्रोश भालेकरांनी व्यक्त केला आहे. शेतमाल विकण्यास शहरात गेलेल्या शेत□-याला शिपाई, दलाल, मामलेदार पैशासाठी कसा त्रास देतात याचे वर्णन आले आहे. या सर्वांच्यापुढे भेदरलेला राघू गाडीवान सामान्य शेतक-यांच्या अगतिकतेचा प्रातिनिधिक ठरतो. 'लोकल फंडाचा' पोवाडयातून सरकार शेतक-यांकडून शेतसारा घेत. या सा-याची वसुली व खर्चाची पध्दती किती अन्यायकारक आहे हे भालेकरांनी सांगितले आहे. शेतक-यांच्या मागासलेपणाची कारणमीमांसा भालेकरांनी केली आहे. शेतक-यांच्या दैन्यावस्थेला कारणीभूत घटकांचे अचूक वर्णन नेमक्या क्रमाने ते करतात.

मोठी काळजी पावसाची दुसरी किडक्या रोगाची।
पक्षी तिसरे पशू चवथे चोर पाचवे ठगाची ।
सहा सर□ार सात सावकार आठ उदमी फसविती।
नऊ ग्रहाची शनी भटाची पिडा दिशादस पळविती।
अकरा आडाणी बारा बलुते तेरा व्यसने पाठीशी।
चौदा आळशी पंधरा परंपर रोगदुर्गत गाठीशी ।[३]

शेतकरी जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण, अनुभवाची समृध्दी, समस्येच्या मूळांचा शोध घेण्याची डोळसदृष्टी, बांधिलकी, आत्मीयता, शेतक-यांच्या दु:खाची प्रगल्भ जाण व त्यांच्या उत्थानाची आस यांचे दर्शन भालेकरांच्या कवितेतून दिसते.१८७७ साली दक्षिण भारतात पडलेल्या दुष्काळात

होरपळलेल्या हजारो जिवांचे दु:ख, व्यथा व वेदना ग्रामीण जनजीवनाचे दाहक वास्तव चित्रण त्यांनी दक्षिणेतील सन '१८७७ चा भयंकर दुष्काळ' या पोवाडयातून केले आहे. या दुष्काळामध्ये अन्नपाण्यावाचून तडफडणारी माणसे, प्रेतांचे ढीग, सरकारी पक्षपाती भूमिका, उध्दवस्त खेडी यांचे भेदक व कारूण्यमय चित्रण भालेकरांनी केले आहे. आधुनिक मराठी कवितेत १८७७ च्या दुष्काळाचे वर्णन करणारी ही एकमेव करूणरसपूर्ण कविता आहे. 'हितोपदेश' या शीर्षकांतर्गत एकूण पंधरा अभंग व त्यानंतर हिंदीमधून पाच पदे कृष्णराव भालेकरांनी लिहिली असून जातीभेद निर्मूलन, विद्येचे महत्त्व आणि कष्टक-यांच्या दु:खपूर्ण जीवनाचे चित्रण यात केले आहे. 'शेतक-यांचे मधूर गायन' या सामाजिक आशयघन उपदेशपर ३२ पदामध्ये पाटील कुलकर्णी, शेट सावकार, मारवाडी यांच्या वृत्ती प्रवत्तीचे चित्रण आले आहे. यामधील 'खरा पाटील' या पदामध्ये गावचा पाटील कसा असावा याचे नेटके वर्णन भालेकरांनी केले आहे.

पाटील कैसा गावी असावा। मायबाप तो रयतेला।
शुध्दाचरण सत्य भाषण। मोठे भूषण गावाला।[४]

म. फुल्यांच्या अखंड प्रमाणे भालेकरांनी श्रीखंड लिहिले . या श्रीखंडामधून सामाजिक आशय व्यक्त झाला आहे. कृषीजन संस्कृतीचे शोषण करणारी व्यवस्था, या व्यवस्थेकडून कृषीजन समूहाच्या अशिक्षितपणाचा , उदारपणाचा व विश्वासू प्रामाणिक मानसिकतेचा गैरफायदा घेऊन त्यांना लुबाडणा-या प्रवृत्ती, या प्रवृत्तीची नाना रूपे व त्यामुळे कृषीजन समूहाचा झालेला -हास या एका अत्यंत महत्त्वाच्या व जनजीवनाच्या अस्तित्वाशी निगडित ज्वलंत विषयाला काव्यातून भालेकरांनी वाचा फोडली. ग्रामीण जीवन जाणिवा आपल्या काव्यातून आविष्कृत करणारे कृष्णराव भालेकर हे एकोणिसाव्या शतकातील अत्यंत महत्त्वाचे कवी आहेत.

पं. धोडीराम कुंभार यांनी पेशवाईतील जुलुमाचा पोवाडा (१९१८) साली लिहिला आहे. या पोवाडयातून शेतकरी व कारागिरांची दु:स्थिती व त्यांच्या शोषणाचे दर्शन घडते. पेशवाईत पेंढारी लुटीत असत. वरचेवर धाड पडत असे आणि यामध्ये भुकेकंगाल शेतकरी अधिकच नागविला जात असे याचे दारूण वर्णन कवीने केले आहे.

मोतीराम तुकाराम वानखडे हे सत्यशोधक चळवळीचे क्रियाशील कार्यकर्ते होते. त्यांनी शेतक-यांच्या तत्कालीन झालेल्या दारूण स्थितीचे वर्णन करू-न सरकारने करावयाच्या सुधारणांची मांडणी 'शेतक-यांची गोफण' (१९०३) या काव्यपुस्तिकेतील १८ पदातून केली आहे. पि□ाची सुधार□ा व्हावी, शेतीच्या पारंपरिक धंद्यात बदल व्हावा तसेच शेतकरी पतपेढया स्थापून सावकरांच्या लुटीतून सुटण्यासाठी कमी व्याजाने पैसे देण्याचा आग्रह कवीने केला आहे. 'सत्यशोधक चाबूक' (१९०८) या पंधरा पदे असणा-या रचनेमधून कवीने देवाची भक्ती करतांना मध्यस्थाची जरुरी नाही हे सत्यशोधक समाजाचे तत्त्व असतांना ब्राह्मण, भटजी, गुरू, साधू, पुजारी इत्यादी मंडळी देव व भक्त यांच्यामध्ये मध्यस्थाचे काम करणा-यावर त्यांनी कडाडून हल्ला चढविला आहे व मध्यस्थांच्या समूळ उच्चाटनाची भूमिका मांडली आहे. मोतीराव वानखडे

यांचा 'भटाचे थोटांड खंडन अथवा सत्पथ प्रदीप' (१९२५) हा २८२ कविता असणारा महत्त्वाचा काव्यग्रंथ आहे.

मुकुंदराव पाटील यांनी 'कुळकर्णीलीलामृत'(१९१३) आणि 'शेटजी प्रताप' (१९२४) या खंडकाव्यातून ग्रामीण भागातील दरिद्री , अज्ञानी शेतक-यांचे जीवन , त्यांच्या समस्या, त्यांच्या वेदना, दु:ख, हुंकार याचे चित्रण केलेले आहे. शेतक-यांची दुरावस्था, सरकारी नोकर, सावकार, धर्माचे ठेकेदार, भट- भिक्षूक यांच्याकडून त्यांचे होणारे शोषण, दुष्काळ, कर्जबाजारीपणा, अज्ञा-ा इत्यांदीचे वास्तव चित्रण करू-ा तत्कालीन ग्रामीण शेतकरी समाजाचे नेटके दर्शन घडविले आहे. शेतक-यांच्या अधोगतीचे , जीवन मरणाच्या प्रश्नांचे चित्रण लोकपरंपरेतील देशी, ओवीबध्द,पौराणिक रनाबंधात करून ग्रामीण कृषीजनसमूहाच्या शोषणाची व अधोगतीची कारणमीमांसा करणारी मुकुंदराव पाटील यांची ही मराठीतील पहिली सामाजिक खंडकाव्ये आहेत. काव्यदृष्टया ती अत्यंत सरस असून देशी मराठी साहित्याचे लेणे शोभणारी आहेत. डॉ. अशोक एरंडे यानी तत्कालीन मराठी कवितेच्या मूळप्रवृत्तीशी मुकुंदराव पाटील यांच्या कवितेची तुलना करताना म्हटले आहे, इंग्रजी वाड्.मयाचे वळण गिरविणा-या उसन्या घेतलेल्या प्रेरणांचा मागोवा घेत, अंधानुकरणाने काव्यलेखन करणा-या , इंग्रजी कवितेचे केवळ मराठीत भाषांतर □र□ा-या या काळात मुकुंदराव पाटील यांची कविता समाज जीवनातून स्त्रवलेली, पोसलेली आणि जीवनासाठी अवतरलेली कविता आहे याची जाणीव होते.[५] मुकुंदराव पाटील यांच्या खंडकाव्यात समाजाच्या परिघावरील खेडेगावातील शेतकरी, शेतमजूर, कुळे, पाटील, कुलकर्णी, शेटजी यांच्या जीवनशैलीचे , परिसराचे, परस्पर संबंधाचे, शोषणाचे, वेदनाचे , दु:ख- दारिद्रयाचे वास्तवपूर्ण चित्रण मराठीत प्रथमच केले आहे. याशिवाय मुकुंदराव पाटील यांनी सामाजिक आशयपर सात रचना सुबोध श्लोक या सामाजिक आशयप्रधान काव्यातून केल्या आहेत

नारायण रामचंद्र विभूते यांनी १९२० साली सत्यधर्माची थोरवी गाणारे, नीती व सदाचरणाचा मार्ग दाखविणारा ११७ ओव्याचा काव्यग्रंथ 'सत्यधर्मामृतकथन' या नावाने प्रसिध्द केला आहे. या काव्यग्रंथात नीतीपर उपदेश करतांना सामाजिक बांधीलकीचा पुरस्कार केला असून फसव्या व अन्यायी माणसापासून सतत दूर राहण्याचा सल्ला दिला आहे.

शामराव सीतारामजी कुलट यांचा 'सत्यशोधक समाजाचे अभंग' (१९२२) हा काव्यग्रंथ आहे. अंधश्रध्देने हीनपदास पोचलेल्या भोळयाचे अनेक मानसिक रोग या अभंगाने भंग पावतील[६] असा अभिप्राय का. बा. देशमुख यांनी या कवितांबद्दल दिला आहे. सत्यशोधक समाजाचे माहात्म्य, मध्यस्थाचे उच्चाटन, विद्येचे महत्त्व, अनिष्ट कालबाह्य सामाजिक रूढींना व मूर्तिपूजेला विरोध, आणि शेतक-यांच्या दैन्यावस्थेला जबाबदार असणा-या नवग्रहांचे अचूक वर्णन कवीने केले आहे.

पहिला ग्रह तो ब्राह्मण। भोळया नाडी रात्रंदिन।
दुजा ग्रह मारवाडी । शेतक-या बहु नाडी ।
वैद्य ग्रह तिसरा । मांडी दयेचा पसारा।
चौथा ग्रह जाणा वेश्या। जना नाडी ती हमेशा ।
पाचवा तो ग्रह वकील । भोळयाभाळया जना बहु नाडी।[७]

रामचंद्र बाबजी जाधव (दासराम) यांनी 'सुबोध सुमनावली' (१९२२) 'सद्बोध' (१९२) व 'धर्मभ्रष्ट हिंदूचे व मोहरममधील चाळे व सज्जनांस विनंती' (१९२७) या तीन काव्यपुस्तिका सत्यशोधकीय विचारांच्या प्रसारासाठी प्रकाशित केल्या. यांच्या कविता कालबाह्य सामाजिक रूढी परंपरा, जातिभेद निर्मूलन, मध्यस्थांचे उच्चाटन , सत्यमार्ग अशा विविध सामाजिक प्रश्नाचे चित्रण करणारी आहे. या काव्यातून नवमतवादाचा पुरस्कार मांडला आहे.

□शवराव जेधे यांनी १९२२ साली 'छत्रपती मेळा' सुरू केला.या मेळयाने १९२२- १९२६ पर्यंत गणेशोत्सवामध्ये पुणे शहरात खळबळ उडवून दिली. 'हिंद देश माझा' या पदातून उच्चनीच भेद दूर जाऊन सर्वांना जवळ येण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. शेतक-याच्या दु:खाचे महत्त्वाचे कारण म्हणजे दुष्काळ. दुष्काळाच्या खाईत सापडलेल्या शेतक-याच्या अपार दु:खाला 'दुष्काळाचे दिवस' या पदातून वाचा फोडली आहे. शेतक-याची मालमत्ता, गुरेढोरे, घरे-दारे □शी सावकाराच्या घशात जातात याचे वर्णन कवीने केले आहे.

दुष्काळाचे दिवस उगवले । नाही खायला, दीन दुबळयाला ।
सावकारांचे कर्ज काढीती । गहाण ठेविती मालमत्तेला।
शेतीभाती, घरेदारे । मजूरवर्गाचे होती धनिकाचे ।[८]

या मेळयामुळे राजकारण, समाजकारण, धर्मकारण यामधील उच्चवर्णियांच्या लबाडया प्रथमच लोकांच्या समोर आल्या. त्यामुळे बहुजन लोक राजकीय व सामाजिक दृष्टया एकवटले. मागणीनुसार केलेल्या प्रचारक पदांमध्ये काव्यगुण बेताचेच आहेत. यमक जुळवण्याचा प्रयत्न केला असला तरी या पदातून व्यक्त होणारी चीड आणि राग श्रोत्यांच्या अंत:करणाला भिडत आहे. जशास तसे या न्यायाने उत्तर देणे हीच पद रचनेमागील भूमिका आहे.

हरिभाऊ चव्हाण यांनी 'श्री सत्यनारायण कथा' (१९२३) ही काव्यपुस्तिका लिहिली आहे. त्यांनी बहुजन समाजावर सत्यनारायण कथेचा खूप मोठा प्रभाव असल्याचे ओळखून लोकश्रध्देचा व ओवीबध्द पौराणिक रचनाशैलीचा समाज प्रबोधनासाठी अत्यंत प्रभावी उपयोग करून घेतला . सत्य हाची देव मानून सत्य महिमा वर्णिला आहे.

□ाशीराव देशमुख यांनी कथा, कीर्तने आणि पोथ्या पुराणे इत्यादी धर्माच्या पवित्र नावाखाली मोडणा-या साधनांवर अशिक्षित व अल्पशिक्षित लोकांची श्रध्दा सहज बसते म्हणून 'कीर्तन रत्नमाला' (१९२५) लोकपरंपरेच्या स्वरुपात प्रसिध्द केले. सद्गुरू, जातीभेद निर्मूलन, धर्माचे प्रगत स्वरूप, व्यसनाचे दुष्परिणाम सांगून वेद, धर्मशास्त्रे व पुराणादी ग्रंथाची बुध्दिवादी चिकित्सा केली आहे.

समकालीन मराठी कविता व सत्यशोधकीय ग्रामीण कविता

१८८५ ते १९२० हा आधुनिक मराठी कवितेचा क्रांतिकाळ मानला जातो. केशवसुत, ना. वा. टिळक, माधवानुज, दत्त, विनायक , लक्ष्मीबाई टिळक, गोविंदाग्रज, रेंदाळकर, बी, बालकवी इत्यादी प्रमुख कवींनी आपल्या रचना या काळात लिहिल्या. सामाजिक समता, कालबाह्य रूढीपासून स्वातंत्र्य आणि स्त्री-पुरूष समानतेला प्राधान्य ही केशवसुत संप्रदायाची वैशिष्टये होत. या कालखंडात कवींच्या काव्यलेखनावर सौंदर्यावादाचा प्रभाव अधिक होता. प्रेम, निसर्ग, समाज, वैयक्तिक भाव -भावना, कवी, काव्य, गूढवाद इत्यादी कवितेचे विषय होते.

□शवसुत काळाचा विचार केल्यास कृष्णराव भालेकर, पं.धोंडीराम कुंभार, मोतीराम वानखडे यांच्या कविता या काळात प्रसिध्द झाल्या आहेत. त्यांच्या कवितेतून शेतकरी, कष्टकरी, कारागीर, श्रमिक यांचे दु:ख, दारिद्रय, अज्ञान, अस्पृश्यता, जातिभेद, शिक्षण आदी विषय आलेले आहेत. शेतक-यांच्या मागासलेपणाची कारणमीमांसा करून उत्थानाचे उपाय सुचविलेले आहेत. सरकार, नोकरशाही, सावकार, भटजी व व्यापारी यांच्याकडून शेतकरी व कारागीर कसा भरडला जातो. याचे सूक्ष्म व विदारक चित्रण कृष्णराव भालेकरांनी केले आहे. १८७७ साली पडलेल्या भीषण दुष्काळाचे भयंकर स्वरूप व झालेल्या हाहाकाराचे ह्दयद्रावक व□-न □ष□राव भाले□रां-ी 'दक्षिणेतील १८७७ चा भयंकर दुष्काळ' या पोवाडयातून केले आहे. तत्कालीन परिस्थितीत मराठी साहित्यात दुष्काळासारख्या अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर लिहिणारे कृष्णराव भालेकर महत्त्वाचे कवी आहेत.

□शवसुत काळात सत्यशोधक ग्रामीण कवितेमधून समाजनिष्ठ व परिवर्तनवादी विचार प्रवाह वाहत होता.या कवितेने ग्रामीण शेतकरी-कष्टकरी समाज केंद्रस्थानी मानून त्यांच्या शोष□मुक्तीचा विचार मांडला. हे सत्यशोधकीय ग्रामीण कवितेचे वेगळेपण आहे. परंतु या कवितेची दखल मराठी साहित्यात घेतली गेली नाही.

मराठी साहित्यात १९१० ते १९२० या काळात बालकवी, गोविंदाग्रज, बी, रेंदाळ□र हे कवी काव्यलेखन करीत होते. प्रेम, निसर्ग सामाजिक रूढी परंपरांना नकार, तत्वचिंतन असे त्यांच्या कवितेचे स्वरूप होते. १९२२ च्या आसपास रविकिरण मंडळ अस्तित्वात आले. माधव ज्युलियन, गिरीश, यशवंत, श्री. बा. रानडे व सौ. रानडे, गं. त्र्य. माडखोडळकर, दिवाकर, वि.द. घाटे आदी कवी रविकिरण मंडळामध्ये होते. माधव ज्युलियन, गिरीश व यशवंताची काव्यरचना विपुल आहे. ती दीर्घ खंडकाव्यात्मक आणि स्फूट भावकाव्यात्मक आहे. त्यांच्या कवितेत मध्यमवर्गीय पांढरपेशांच्या भावभावनांचे चित्रण आहे. 'विरह तरंग' व 'सुधारक' (माधव ज्युलियन) 'अभागी कमला', 'आंबराई', 'कला' (गिरीश) 'बंदीशाळा', 'काव्यकिरीट' (यशवंत) ही खंडकाव्ये या काळात निर्माण झाली. रविकिरण मंडळातील कवींनी शहरी, मध्यमवर्गीय सौंदर्यवादी दृष्टिकोनातून अनागरी ग्रामीण जीवनाचे वर्णन करणारी जानपदकाव्ये लिहिली. ती काव्यरचना कार्यक्रमातून लोकप्रिय झाली. या काळातील महत्त्वाचे दोन कवी म्हणजे चंद्रशेखर व भा. रा. तांबे आहेत. चंद्रशेखरांचे 'काय हो चमत्कार' हे खंडकाव्य १९११ मध्ये प्रसिध्द झाले , त्यांची कविता पंडिती वळणाची होती. भा. रा. तांबे यांनी सौंदर्यवादी भावकविता लिहिल्या आहेत.

या कालखंडातील सत्यशोधक ग्रामीण कवींच्या सामाजिक विषयावरील कविता प्रसिध्द झाल्या आहेत. मुकुंदराव पाटील हे या काळातील प्रमुख सत्यशोधक कवी आहेत. त्यांची

'कुळकर्णीलीलामृत' (१९१३) 'शेटजी प्रताप' (१९२४) ही खंडकाव्य प्रसिध्द झाली आहेत. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळातील महाराष्ट्राचे ग्रामीण समाजजीवन व कुलकर्ण्याकडून अज्ञानी, गरीब शेतक-यांचे होणारे शोषण याचे वास्तव व जिवंत चित्रण कुळकर्णीलीलामृत मध्ये झाले आहे. सावकारांकडून शेतक-यांच्या होणा-या आर्थिक शोषणाचे व अपार दु:खाचे विदार दर्शन शेटजी प्रताप या खंडकाव्यातून घडविले आहे. अस्सल ग्रामीण परिसर, ग्रामीण जीवनशैली व कृषिजीनसमूहांच्या प्रश्नांचा वेध घेणारी मराठीतील पहिली सामाजिक खंडकाव्ये मुकुंदराव पाटील यांनी लिहिली आहेत.

१९२० ते१९३० या काळात रविकिरण मंडळाची कविता आहे. या काळात तांबे यांचे ही काव्यलेखन सुरूच होते. विविधतेने नटलेल्या रविकिरण मंडळाच्या कवितांचे विडंबन करण्याकरिता आचार्य अत्रे यांनी 'झेंडूची फुले' (१९२५) प्रसिध्द करुन विडंबन काव्याला मराठी कवितेत स्थान मिळवून दिले. आचार्य अत्रेच्या उपहासात्मक कवितेमुळे काव्यनिर्मितीचे प्रमाण कमी होऊ लागले होते. यानंतर कुसुमाज यांच्या प्रेम, सामाजिक व ध्येयवादी कविता प्रसिध्द झाल्या.

या काळात सत्यशोधक ग्रामीण कवी शामराव कुलट यांनी 'सत्यशोधक समाजाचे अभंग' (१९२२) या काव्यपुस्तिकेत सत्यशोधक समाजाची थोरवी गाऊन, धर्माचे स्वरुप, देव व भक्त यामधील मध्यस्थाचे उच्चाटन , अनिष्ट कालबाह्य रूढींना विरोध दर्शविला आहे. जामचंद्र जाधव यांनी 'सुबोध सुमनावली' (१९२२) 'सद्बोध' (१९२४) व 'धर्मभ्रष्ट हिंदूचे मोहरमधील चाळे व सज्जनास विनंती' (१९२७) या तीन काव्य पुस्तिकेमधून सत्यधर्म व म. फुल्याच्या कार्याचा गौरव केला आहे.

पोवाडें, उपदेशपर लावण्या, श्रीखंड, अभंग, पौराणिक आख्यानकाव्याच्या धर्तीवरील खंडकाव्य, पारंपरिक पोथीसदृश्य श्री सत्यनारायण कथा व विविध वृत इत्यादी रचनामधून सत्यशोधकीय ग्रामीण कविता अभिव्यक्त झाली आहे. ती अस्सल देशी, मातीशी इमान राखणारी, मातीत राबणा-या व मातीवर प्रेम करणा-या , कष्ट करणा-या , शेतकरी कष्टक-यांच्या व्यथा-वेदनांना वाचा फोडणारी आहे. न्याय, समता, बंधुता, शोषणमुक्ती, मानवता या मानवी मूल्याची प्रतिपादन या ग्रामीण कवितेतून होते. म्हणून मराठी वाड्.मयाच्या इतिहासात या वास्तववादी कवितेची नोंद झाली पाहिजे.सत्यशोधकीय ग्रामीण कवितेचे क्रांतीतत्त्व मराठी कवितेने स्वीकारले असते तर समाजक्रांतीचा जागर घालण्याचे सामर्थ्य व शैली मराठी कवितेस प्राप्त झाली असती असे म्हणावे वाटते.

संदर्भ :-

१. ठाकूर,रवींद्र(स.) - क्रांतीजागर,स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस, पुणे, १९९९,आ.पहिली,पृ.३७,३८

२. माळी,मा.ग.- सावित्रीबाई फुले समग्र वाड्.मय,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मंबुई, १९९८, आ. दुसरी, पृ.८६

३. रायकर, सीताराम (सं) -कृष्णराव भालेकर समग्र वाड्.मय, म. फुले समता प्रतिष्ठान प्रकाशन,पुणे,१९८५, पोवाडे.पृ.११

४. रायकर, सीताराम (सं) -[illegible]राव भालेकर समग्र वाङ्.मय, म. फुले समता प्रतिष्ठान प्रकाशन,पुणे,१९८५, शेतक-याचे मधुर गायन.पृ.२५
५. एरंडे, अशोक- सत्यशोधक मुकुंदराव पाटील, स्फूर्ती प्रकाशन,अहमदनगर,१९९६, आ. पहिली,पृ.७७
६. [illegible]लट, शामराव-सत्यशोधक समाजाचे अभंग,पृ. ३१
७. [illegible]लट, शामराव-सत्यशोधक समाजाचे अभंग,पृ. २२,२३
८. जेधे, केशवराव- छत्रपति मेळा पद्यसंग्रह,१९२८, पृ. १९